# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०७.०९.२०२६ सोमवार**

**मा. न्यायालयातुन आरोपींना सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०७.०९.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा विशेष न्यायाधिश, एमपीआयडी कोर्ट, नागपुर, श्री आशिष ए. अयाचित साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. २३९/२०२१ मधील, पोलीस ठाणे वाठोडा येथील अप. क्र. ४२५/२०२० कलम ४०९,४२०,४६७,४६८,४७१,१२० ब भा.दं.वि., सहकलम ३, एमपीआयडी ॲक्ट या गुन्ह्यातील आरोपी १) पुरुषोत्तम तुळशीराम बेले वय ५४ वर्षे, रा. प्लॉट नं. २, सर्वश्री नगर, दिघोरी, नागपूर २) नरेश तुळशीराम दांडेकर वय ५२ वर्ष रा. गोपाल अपार्टमेंट, जुना सुभेदार, शारदा चौक, नागपूर ३) वासुदेव विठोबाजी हिरुळकर वय ५१ वर्ष रा. प्लॉट क्र. ४६०/७, आनंदनगर, सक्करदरा, नागपूर ४) दींगाबर आनंदराव येवले वय ६४ वर्ष रा. प्लॉट क्र. ११७, भोलेबाबा नगर, ईरा कॉन्व्हेंटजवळ, नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपींना कलम ३ एमपीआयडी ॲक्ट कायद्यान्वये ०६ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येकी ५०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ४०९,४६७ भांदवि कायद्यान्वये ०६ वर्षे कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा, तसेच कलम ४७१ भादंवि कायद्यान्वये ०२ वर्षे कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा, तसेच १२० ब भादंवि कायद्यान्वये ०६ महिने कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१९ दरम्यान, यातील आरोपी यांनी विश्वकर्मा ग्रामिण शेती सहकारी पतसंस्था मर्यादित सोसायटी, मुख्य कार्यालय, लांजेवार शाळेजवळ, खरबी येथील पदाधिकारी असतांना, त्यांनी व्यवस्थापक, रोखपाल व लिपीक यांचेसोबत संगनमत करुन नियमबाहय बेकायदेशीर व्यवहार करुन ठेवीदार यांनी संस्थेमध्ये ठेवलेली एकुण रक्कम २,२२,८०,७१०/— रु. चा अपहार करुन संस्थेची व ठेवीदारांची फसवणुक केली. फिर्यादी श्री पुंडलिक यादवराव पलांदुरकर वय ५० वर्ष रा. गोधनी, लेखा परिक्षक यांनी पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपींना दिनांक ३०.०१.२०२१ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तत्कालीन तपासी अधिकारी मसपोनि. श्रीमती शरयु देशमुख, आर्थिक गुन्हेशाखा यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री अभय जिकार यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. विकास गिरमकर व विशाल भारद्वाज यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी नापोंअ. संजय ठाकरे यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) पाचपावली पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक. ०५ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०२.०९.२०२६ चे १२.०० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, प्लॉट क्र. ४६, हनुमान सोसायटी, पंचकुवा मैदानाजवळ राहणाऱ्या फिर्यादी सौ. अंशिता सचिन कोटांगळे वय ४९ वर्षे या त्यांचे राहते घराला कुलुप लावुन मुलीसह आईचे घरी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरुमधील दिवाणचे लॉकरमधील सोन्याचांदीचे दागिने व गुल्लकमधील रोख १५,०००/—रू. असा एकूण ७३,८००/— रु. चा मुद्येमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न करुन आरोपीचा शोध घेत असता, तो त्याचे ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ एएच ७४६२ सह मिळून आला. पळून जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यास ताब्यात घेतले. नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव अंकित रतन मेश्राम वय २८ वर्षे रा. रानी दुर्गावती चौक, गोंड मोहल्ला, यशोधरानगर, नागपुर असे सांगितले. त्यास विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा त्याचे साथीदारासह केल्याची कबुली दिली. तसेच त्याने नमुद गुन्याव्यतिरिक्त पोलीस ठाणे हद्यीत इतर दोन घरफोडी व दोन वाहनचोरी असे एकूण ०५ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याचांदीचे वेगवेगळे दागिने, लोखंडी कटौनी, ०२ कंम्प्युटर मॉनिटर व होंडा ॲक्टिवा मोपेड असा एकूण १,००,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ३, मा. श्री शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिरुध्द पुरी, पोनि. गुन्हे विवेक पडधान, सपोनि प्रमोद सोनवणे, सचिन भोंडे, पोहवा. रविंद्र राऊत, मुकेश यादव, सुशिल रेवतकर, राजकुमार पाल, विनोद समुद्रे, सुरेंद्र तायडे, मिथुन चवरे पोअं. युनुस खान, अमित ठाकूर, महेंद्र सेलोकर,यांनी केली.



**२) पाचपावली पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचे गुन्हयातील पाहिजे आरोपीकडुन ६,५३,३४३/— रु. चा मुद्येमाल जप्त**

पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, प्लॉट नं. ४५३, गमदुर बार मागे, सिदधार्थ नगर येथे राहणारे फिर्यादी जिलानी युनुस कलीवाला वय ५० वर्षे हे दिनांक १६.०७.२०२६ चे ०९.०० वा. आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह अजमेर शरीफ येथे गेले होते. फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर घराचे मागील दार उघडे दिसल्याने, त्यांनी मोबाईलवरुन सीसीटिव्ही फुटेज चेक केले असता, दिनांक १९.०७.२६ चे ०२.३० ते ०५.०० वा. चे दरम्यान, अज्ञात ०३ चोरट्यांनी फिर्यादीचे घराचे बाथरुमचे व्हेंटीलेशन खिडकी तोडून, आत प्रवेश करुन,

चोरी केल्याचे दिसले. फिर्यादी यांनी घरी येऊन चेक केले असता, चोरटयांनी बेडरुममधील कपाटातील रोख ५,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १७,५१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न करुन आरोपी १) हिमांशु हरीदास लोखंडे वय २३ वर्षे रा. गली क्र. ९, लष्करीबाग, पाचपावली नागपुर २) विवेक उर्फ विक्की युवराज धोटे वय २३ वर्षे, रा. ५०/१२, संजीवनी क्वॉटर्स, गली क्र. १, यशोधरानगर, नागपुर यांना व एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन रोख २,४८,५००/— रु., गुन्हा करतांना वापरलेली सुझुकी बर्गमन गाडी क्र. एमएच ३१ जीएफ ०८६७ व एक लोखंडी कटौनी असा एकुण ३,२८,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. ०२ आरोपींना अटक करण्यात आली होती. गुन्हयातील निष्पन्न पाहिजे आरोपी नामे मुस्तफा उर्फ शानु जमील खान याचा शोध सुरु होता. आरोपीचे शोधादरम्यान नमुद आरोपी हा पोलीस ठाणे रामनगर, चंद्रपुर येथील चेन स्नॅचिंगचे गुन्हयात अटक असल्याची माहिती प्राप्त झाल्याने त्यास कायदेशीर प्रक्रिया करुन ताब्यात घेतले व तपासामध्ये आरोपीचे ताब्यातुन सोन्याचे दागिने व सोन्याची लगड वजनी १४० ग्राम असा एकूण कि. ६,५३,३४३/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ३, मा. श्री शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिरुध्द पुरी, सपोनि प्रमोद सोनवणे, पोउपनि नरेश पंडीत, पोहवा. रविंद्र राऊत, मुकेश यादव, सुशिल रेवतकर, राजकुमार पाल, पोअं. युनुस खान, अमित ठाकूर, महेंद्र सेलोकर यांनी केली.



**<u>३) तहसील पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक</u>**

पोलीस ठाणे तहसील हद्दीत, गोळीबार चौक, टिमकी तिनखंबा, खापरे मोहल्ला येथे फिर्यादी मोहम्मद शहबान अन्सारी मोहम्मद शरीफ अन्सारी वय ३३ वर्षे रा. यादवनगर, नागपूर यांचे भाडयाने घेतलेले रोमन ट्रेडर्स नावाचे दुकान आहे. दिनांक ०३.०९.२०२६ चे २२.३० वा. ते ०४.०९.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी आपले दुकानाला कुलुप लावुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे दुकानाचे आत प्रवेश करुन, कॅश काऊंटरमधील रोख १,७०,०००/—रू. चोरून नेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान तहसील पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न करुन आरोपी १) वेदांत उर्फ छोटा कालु विकास चाटे वय १९ वर्षे २) हिमांशु विकास चाटे वय २० वर्ष ३) विनीत उर्फ काल्या कुऱ्हाडकर वय २० वर्षे, तिन्ही रा. समता बुध्द विहारसमोर, टिमकी तीनखंबा, नागपुर यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा त्यांचे ०२ विधीसंघर्षग्रस्त बालक साथीदार यांचेसोबत संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपी क्र. १ व ३ यांचे ताब्यातुन रोख ७०,०००/— रु. जप्त करण्यात आले आहेत.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि.क्र. ३, मा. श्री राजेश तटकरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संजय मेंढे, पोनि सतिश फरकाडे, पोउपनि मनिष शाहाकार, पोहवा. पंकज बोटरे, प्रदीप सोनटक्के, फिरोज खान, पोअं. हंसराज पाउलझगडे, सुनिल सेलोकार, संदीप शिरफुले व राम ठाकुर यांनी केली.



**<u>४) कळमना पोलीसांची कामगीरी :— चोरी/वाहनचोरी करणाऱ्या आरोपींना अटक. ०३ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक १२.०६.२०२६ चे ००.३० वा. ते ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. १०, रानी दुर्गावती सोसायटी, विजयनगर, कळमणा, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती रेखा अनिल कहर वय ३५ वर्षे ह्या त्यांचे घराला कुलुप लावुन परिवारासह बहिणीचे घरी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, घरात प्रवेश करून, बेडरूम मधील आलमारीतील रोख ५०,०००/— रु. व सोन्या—चांदीचे दागिने किंमती असा एकुण कि. १,१९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी सागर उर्फ भांजा अशोक वर्मा वय २३ वर्षे, रा. बिरसा मुंडा चौक, बारापात्रेचे घरी किरायाने, फुटाळा अंबाझरी, कळमना, नागपुर यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडी केल्याची कबुली दिली. त्याचे ताब्यातुन सोन्याचांदीचे वेगवेगळे दागिने असा कि. १,६४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १३.०७.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, लता मंगेशकर गार्डन बाहेर, नागपूर येथे फिर्यादी तुषार विनोद धमगाये वय १९ वर्ष रा. मिनी माता नगर, गली क्र. २० यांनी त्यांची पॅशन प्रो गाडी क्र. एमएच ४९ बीडी २७४३ कि. ५०,०००/— रु. ची लॉक करुन, पार्क करुन ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी विकास उर्फ अंगद लक्ष्मण वर्मा वय २२ वर्षे, रा. विजयनगर, दुर्गा चौक, कळमणा, नागपूर यास ताब्यात घेवुन, त्याची विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरीचा गुन्हा तसेच इतर एक ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ एम ७२८९ कि. २५,०००/— रु. ची सुध्दाा चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीस अटक करून त्याचे ताब्यातुन दोन्ही गुन्ह्यातील वाहने किंमती ७५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. कळमणा पोलीसांनी ०२ आरोपींना अटक करून एकूण ०३ गुन्हे उघडकीस आणुन एकूण २,३९,०००/— रु. चा मुद्येमाल जप्त केला आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोनि. गुन्हे करीम पठान, सपोनि. अजय जाधव, पोहवा. रविकुमार शाहु, प्रदीप पवार, पोअं. मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव, प्रफुल्ल गोहोकार यांनी केली.



**<u>५) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचे यापुर्वी उघडकिस गुन्हयातील सोन्याचा मुद्येमाल जप्त.</u>**

दिनांक ०३.०३.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ०१.०४.२०२६ चे १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, २५० यर्जुवेद, दिक्षीत नगर, कपिलनगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी महेश दयालदास मोटवाणी, वय ६३ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलाचे घरी बॅगलोर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने, चांदीचे सिक्के, डायमंड वॉच असा एकुण किंमती ८,३८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे तपासात, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून यापुर्वी ०४ आरोपींना अटक करून एकुण १९,६५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला होता. गुन्हयातील आरोपींनी काही सोने सराफा व्यापारी यास विकल्याचे सांगितले होते. दिनांक ०५.०९.२०२६ रोजी सोनाराकडुन ८० ग्राम सोने कि. ८ लाख रुपयाचा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयामध्ये आजपावेतो एकुण २७,६५,०००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. मुद्देमाल पुढील कार्यवाहीस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री.

दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कराडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**६) पोलीस ठाणे सिताबर्डी :— खुनाचे गुन्हयातील ०४ आरोपींना अटक :**

फिर्यादीचा भाऊ नामे आकाश सुरेश नेवारे वय २५ वर्ष रा. तेलंगखेडी, गोंडटोली खदान, मस्जिदजवळ, रविनगर, नागपूर याचा रविनगर चौक, बसस्टॉपजवळ एमएच ४० नावाचा पानठेला आहे व त्याची यापुर्वीची गुन्हेगारी पार्श्वभुमी आहे. त्याचे वस्तीत राहणारे आरोपी १) पियुष उर्फ पेढा बघेल वय २२ वर्ष २) विशाल उर्फ बब्बु काल्या चचाणे वय २५ वर्ष दोन्ही रा. गोंडटोली, खदान, तेलंगखेडी, नागपूर ३) रंजीत उर्फ रंजु गोपाल महतो वय २५ वर्ष रा. सुदामनगरी, हिलटॉप अंबाझरी, नागपूर यांचीसुध्दा गुन्हेगारी पार्श्वभुमी आहे व त्यांनी फिर्यादीचे भावास 'तेरे को दुकान लगाना है, तो हमको पैसे देना पडेगा' असे म्हणून त्याचे सोबत झगडा भांडण केले होते. त्याच कारणावरुन आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीचे भावास दिनांक ०७.०९.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्यीत, देशपांडे सभागृहाचे मागे, सातपुडा लॉनचे बाजुचे गल्लीत, सिव्हील लाइन, नागपूर येथे धारदार शस्त्राने वार करुन त्यास जिवानिशी ठार केले. फिर्यादी पकंज सुरेश नेवारे वय २३ वर्ष रा. तेलंगखेडी, गोंडटोली खदान, मस्जिदजवळ, रविनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरुध्द कलम १०३(१),३(५) भान्यासं. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

सिताबर्डी पोलीसांचे तपास पथक व गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी खुनाचे गुन्हयातील आरोपींचा शोध घेऊन गुन्हयातील आरोपी क्र. १) विशाल उर्फ बब्बु उर्फ काल्या शालिकराम चचाणे वय २९ वर्ष रा. रामनगर, बालाजी सायकल स्टोअर्सजवळ, तेलंगखेडी, नागपूर २) रंजीत उर्फ रंजु गोपालजी महातो वय २५ वर्ष रा. सुदामनगरी, हिलटॉप अंबाझरी, नागपूर ३) पियुष उर्फ पेढा विनोद बघेल वय ३१ वर्ष रा. गली क्र. २, बागडीचे घराजवळ, रामनगर अंबाझरी, नागपूर ४) मृणाल भोला दिवाण वय २३ वर्ष रा. दामु कनेरे गल्ली, रामनगर, तेलंगखेडी, नागपूर यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्यांनी आरोपी क्र. १ याने मृतक याचेसोबत असलेल्या जुन्या वादाचे कारणावरुन आरोपी क्र. २ ते ४ यांचेसोबत संगनमत करुन खुन केल्याची कबुली दिली. आरोपींना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**